# मुंबई विद्यापीठ

क्रं.घ.म./ ०७ / २०१५–२०१६

परिपत्रक :–

मुंबई विद्यापीठाशी संलग्नीत सर्व शासकीय अनुदानित कला, वाणिज्य, विज्ञान, गृहविज्ञान, नृत्य, विधी आणि शिक्षणशास्त्र महाविद्यालयांचे प्राचार्य व महाविद्यालयातर्फे संबंधित संस्थाचे अध्यक्ष/सचिव यांना कळविण्यात येते की, शिक्षण संचालक, उच्च शिक्षण, पुणे, यांचे पत्र क्र. युएनआय/सेनिवे/६०–६२/२०१५/विशि–६/९३८५ दिनांक २३/०९/२०१५ अन्वये ज्या महाविद्यालयांतील अध्यापकांच्या नियत वयोमानानुसार सेवानिवृत्तीचे वय ६० वरून ६२ वर्षे व प्राचार्यांचे वय ६२ वरून ६५ वर्षे करण्याबाबत शासन निर्णयाच्या अधिन राहून विद्यापीठ स्तरावर समिती गठीत करण्यात आल्यानंतर ज्या शिक्षकांचे/प्राचार्यांचे प्रस्ताव शासनास सादर केलेले आहेत त्या संदर्भातील माहिती खालील तक्त्यात नमूद केल्याप्रमाणे दिनांक २० ऑक्टोबर, २०१५ पर्यंत उपकुलसचिव, घटक महाविद्यालये व संस्था कक्ष, खोली क्र. २०४, दुसरा माळा, फोर्ट, मुंबई तसेच घटक महाविद्यालय व संस्था कक्ष या विभागाचा ई–मेल आयडी –concolsection@gmail.com येथे तात्काळ पाठविण्याची व्यवस्था करावी. आपल्याकडील माहिती प्राप्त न झाल्यास त्याप्रमाणे शिक्षण संचालक, उच्च शिक्षण, पुणे यांना कळविण्यात येईल याची नोंद घ्यावी.

| क्र. | अध्यापकाचे नाव | महाविद्यालय/ विद्यापीठाचे नाव | शासनाने अपात्र ठरविलेले असल्यास शासन आदेश क्रमांक व दिनांक | मा. न्यायालयाने पात्र ठरविले असल्यास त्याबाबतचा तपशील | संबंधित अध्यापक निवृत्त होऊन सेवानिवृत्तीचे सर्व लाभ घेतलेले असल्यास व त्यांना पुन्हा नियुक्ती देण्यात आलेली आहे काय | संबंधित अध्यापक केव्हा सेवानिवृत्त होणार आहेत किंवा झाले आहेत. | संबंधित अध्यापकांच्या सेवेत खंड पडला असल्यास खंडाचा कालावधी व त्याची कारणे |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | |
| | | | | | | | |

सदर माहिती प्राधान्याने विद्यापीठास प्राप्त होईल याबाबत आपण व्यक्तीशः लक्ष देऊन कार्यवाही करावी, ही विनंती.

मुंबई – ४०० ०३२.
दिनांक :– १६/१०/२०१५

(डॉ. एम. ए. खान)
कुलसचिव
मुंबई विद्यापीठ

प्रत माहीतीस्तव आणि पुढील कार्यवाहीसाठी सादर :–

१. मा. श्री हर्षवर्धन जाधव, अवर सचिव, महाराष्ट्र शासन, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, हुतात्मा राजगुरू चौक, मादाम कामा रोड, मंत्रालय, मुंबई – ४०० ०३२.
२. मा. डॉ. धनराज माने, शिक्षण संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे – १.
३. मा. सह–संचालक, मुंबई विभाग, महापालिका मार्ग, मुंबई – ४०० ००१.
४. मा. विभागीय सह–संचालक, कोकण विभाग, पनवेल, जिल्हा – रायगड – ४१० २०६.

(डॉ. एम. ए. खान)
कुलसचिव
मुंबई विद्यापीठ